# प्रेसनोट दिनांक ०३/१२/२०२२

**<u>फायरींग व धारदार शस्त्राने वार निघृण हत्या करणारी टोळी १२ तासात जेरबंद</u>**

पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीत परशुराम चौक, रामनगर, चिंचवड, येथे दि.०२.१२.२०२२ रोजी सायंकाळी जुन्या भाडंणाच्या कारणावरुन तसेच व्यावसायीक वादातून कट रचुन गावठी कट्टा व धारदार शस्त्राने विशाल गायकवाड या तरुणावर हल्ला करुन निघृण खून केला म्हणून पिंपरी पोलीस स्टेशन येथे अर्जुन नागु गायकवाड वय-३२ वर्षे, धंदा वाशींग सेंटर, रा.शिवछत्रपती हौसींग सोसायटीशेजारी, अष्टविनायक चौक, मोरे वस्ती चिखली यांनी फिर्याद दिली होती त्याअनुषंगाने पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्रं. १०५८/२०२२,भादंवि कलम ३०२, १४३, १४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट कलम क्र.३,४,२५,२७ प्रमाणे व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), १३५ व क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३, व ७ प्रमाणे दिनांक ०३/१२/२०२२ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा तात्काळ उघडकीस आणून आरोपींना अटक करणेबाबत मा.पोलीस आयुक्त सो यांनी मार्गदर्शक सुचना दिल्या होत्या.

नमुद गुन्हयामध्ये आरोपीबाबत काहीएक माहिती उपलब्ध नसताना मा.पोलीस आयुक्त सो यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड येथील २०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज चेक करुन तांत्रिक विश्लेषनाव्दारे ०७ पुरूष ०१ महिला आरोपींना १२ तासांच्या आत अटक करण्यात आली असुन ०२ अल्पवयीन बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. उर्वरीत आरोपींना ताब्यात घेवून तांत्रिक विश्लेषनाव्दारे गुन्हयातील अपराध सिध्दी करण्याच्या अनुषंगाने सखोल तपास चालू आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा.अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड, मा.डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, विवेक पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ पिं.चिं., श्रीमती प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड, शंकर अवताडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पिंपरी पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी भोजराज मिसाळ, पो.नि.(गुन्हे) पिंपरी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

(विवेक पाटील)
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी-चिंचवड